नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - ३३३ Issue - 333 | वार सोमवार दि. २१ एप्रिल २०२५ Blow- Monday Date 21 April 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## डॉ. वळसंगकर आत्महत्याप्रकरणी रुग्णालयातील महिलेस अटक

### शिरीष वळसंगकर यांनी लिहून ठेवलेल्या चिठ्ठीतून उलगडा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


सोलापूर : महाराष्ट्राला हादरवून सोडलेल्या डॉ. शिरीष वळसंगकर आत्महत्येप्रकरणी वळसंगकर यांच्या रुग्णालयात प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करणाऱ्या मनीषा मुसळे-माने हिच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आत्महत्येपूर्वी डॉ. वळसंगकर यांनी एक चिठ्ठी लिहलेली होती, यामध्ये मनीषा मुसळे-माने हिच्यामुळेच टोकाचे पाऊल उचलत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

याप्रकरणी सदर बझार पोलीस ठाण्यात गुरनं. ३६५/२०२५ भा न्या सं कलम १०८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हयाचा प्रकार १२ मृत्यूस कारणीभूत असे नमूद करण्यात आले आहे. ८ एप्रिल रोजी रात्री ८.३० वाजेच्या सुमारास डॉ. वळसंगकर यांच्या घरातील बाथरूममध्ये ही घटना घडली आहे. याप्रकरणी डॉ.अश्विन शिरीष वळसंगकर (वय ४५, वर्ष, रा. एस.पी. इन्स्टिट्यूट ऑफ न्यूरोसायन्सेस, वळसंगकर हॉस्पिटल, मोदी रेल्वे क्रॉसिंग,सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मनीषा महेश मुसळे उर्फ मनीषा माने (राहणार सोलापूर) हिच्याविरुद्ध १९ एप्रिल रोजी रात्री दहा वाजता गुन्हा दाखल करण्यात आला असून तिला अटक करण्यात आली आहे.

आरोपी मनीषा ही वळसंगकर हॉस्पिटलमध्ये काम करत होती.तिला डॉक्टर वळसंगकर यांनी वेळोवेळी सहकार्य करून देखील आरोपीने फिर्यादींवर खोटे आरोप करून धमकी वजापत्र पाठवल्याने फिर्यादीच्या वडिलांनी आरोपीच्या त्रासाला कंटाळून राहते घरी स्वतःच्या बेडरूम मधील अटॅच असलेल्या बाथरूममध्ये स्वतःच्या परवाना असलेल्या पिस्टलमधून कानशीलमध्ये गोळी घालून आत्महत्या केली व आरोपी मनीषा ही फिर्यादीच्या वडीलांच्या मृत्यूस कारणीभूत ठरली आहे. असे डॉ. अश्विन यांनी दिलेल्या फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

कोण आहे मनीषा माने ?

मनीषा माने ही मरीआई चौकातील गवळी वस्ती तालीम येथील स्वर्गीय सुरेश निंबाळकर यांचे मोठे बंधू आणि गिरणी कामगार तसेच व्यवसायाने गवळी असलेले हरिभाऊ निंबाळकर यांची कन्या आहे . हरिभाऊ यांना एक मुलगी आणि दोन मुले आहेत. तिचा विवाह सर्वप्रथम मुसळे नाम व्यक्तीशी झाला होता.मात्र पतीला दारूचे व्यसन असल्याने तिने त्याला सोडून माने नामक व्यक्तीशी दुसरा विवाह केला. पहिले पती मुसळे यांच्यापासून मनीषा हिला दोन मुले आहेत. मुलीने दुसरा विवाह केल्यामुळे निंबाळकर कुटुंबीय तिच्याशी बोलत नव्हते .काही वर्षांपूर्वी हरिभाऊ निंबाळकर यांचे निधन झाले. त्यावेळी मनीषा ही वडीलाचे अंत्यदर्शन घेण्यासाठी गवळीवस्ती येथे गेल्यानंतर तिच्या भावांनी तिला तिथे येण्यापासून



मज्जा केला होता. मात्र मनीषा हिने चिडून तिसऱ्या दिवशीचा विधी स्वतःच उरकून वडिलाप्रती आपली भावना व्यक्त केली होती, याचीही चर्चा मोठ्या प्रमाणावर झाली होती. शाळा कॉलेजला असतानाच मनीषा ही त्यांच्या दवाखान्यामध्ये कामाला लागली होती. कालांतराने डॉक्टर वळसंगकर यांच्या घरातली ती मेंबर बनली. हॉस्पिटलमध्ये बघता बघता टॉपवर गेली. डॉक्टर वळसंगकर यांच्यानंतर मनीषा हिचाच हॉस्पिटलमध्ये वट्ट चालत होता. डॉक्टर वगळता अन्य

## जनतेच्या अर्जांवरील कार्यवाहीसाठी मुख्यमंत्री सचिवालयात लवकरच पीजीआरएस प्रणाली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



**मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत झाले सादरीकरण**

नागपूर : विविध कार्यक्रमांमध्ये तसेच येथील सिव्हिल लाईन्स परिसरातील मुख्यमंत्री सचिवालय-हैदराबाद हाऊसमध्ये प्राप्त होणारे जनतेचे अर्ज व निवेदनांवर सकारात्मक कार्यवाही होवून या अर्जाची सद्यस्थिती अर्जदाराला एसएमएसद्वारे कळण्यासाठी पब्लिक ग्रिव्हेन्सेस रिडर्सल सिस्टिम (पीजीआरएस) ही ऑनलाईन प्रणाली लवकरच कार्यान्वित होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज मुख्यमंत्री सचिवालयात या संदर्भात बैठक झाली.

शासकीय कामकाजामध्ये तंत्रज्ञानाचा वापर करून जनतेला तात्काळ दिलासा देण्याचे राज्य शासनाचे धोरण आहे. यास अनुसरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर दौऱ्यावेळी व येथील मुख्यमंत्री सचिवालयात विविध विभागांशी व विषयांशी संबंधित निवेदने, अर्ज व तक्रारी संबंधित विभागाकडे पाठवून त्यावर उचित कार्यवाही होण्याच्या दृष्टीने पीजीआरएस ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री सचिवालयाच्या विशेष कार्यधिकारी आशा पठाण यांनी या ऑनलाईन प्रणाली विषयी सविस्तर सादरीकरण केले.

या ऑनलाईन प्रणालीद्वारे प्राप्त निवेदने व अर्जांचे विभागनिहाय व तक्रारनिहाय वर्गीकरण करण्यात येईल. हे अर्ज व निवेदने स्कॅन करून संबंधित विभागाला आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात येईल व त्याची माहिती एसएमएसद्वारे अर्जदाराला कळेल. संबंधित विभागाकडे पाठपुरावा करण्यात येवून अर्जदाराचा अर्ज निकाली काढल्याबाबत अर्जदारास एसएमएसद्वारे माहिती मिळेल. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी या ऑनलाईन प्रणालीबाबत समाधान व्यक्त केले. लवकरच ही सुविधा जनेतेचा सेवेत रूजू होणार आहे.

बैठकीस विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र सिंगल, मनपा आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मिना, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्यासह सार्वजनिक बांधकाम, भूमि अभिलेख, समाज कल्याण आदी विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

## टिकेकरवाडी येथे धावत्या रेल्वेवर दगड मारल्याने ५ वर्षांच्या मुलीचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर: कर्नाटकातून सोलापूरकडे येणाऱ्या धावत्या पॅसेंजर ट्रेनवर दगड मारल्याने प्रवास करत असलेल्या एका चिमुरडीचा दुर्दैवी अंत झाला आहे. सोलापूर शहरातील टिकेकरवाडी येथे हा दुर्दैवी प्रकार घडल्याची माहिती आहे. विजयपूर ते रायचूर दरम्यान धावणाऱ्या पॅसेंजर एक्सप्रेसमध्ये हा प्रकार घडल्याची माहिती आहे. प्रवास करत असलेल्या पाच वर्षांच्या चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

एका अनोळखी व्यक्तीने बाहेरून दगड मारल्याने गंभीर दुखापत होऊन तिचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. रेल्वे पोलीस याबाबत कसून तपास करत आहेत. आरोही अजित कांगले (वय ५ वर्षे) असं मृत झालेल्या चिमुरडीचे नाव आहे.




आरोही अजित कांगले ही चिमुकली आपल्या कुटुंबासोबत रेल्वेने प्रवास करत होती. पॅसेंजर गाडी सरू असताना अज्ञात व्यक्तीने दगड फेकला. तेव्हा आरोही ही खिडकीजवळ बसली होती. हा दगड थेट आरोहीच्या डोक्यावर येऊन लागला. दगडाचा जोर एवढा होता की आरोही गंभीर जखमी झाली. तिच्या डोक्यातून भळाभळा रक्त वाहू लागले. हे पाहून तिचे आई-वडील खूप घाबरले. जखमी अवस्थेतील आरोहीला सोलापूर रेल्वे स्थानक आल्याबरोबर तात्काळ सोलापूर शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, तोपर्यंत खूप उशिर झालेला होता. रुग्णालयात पोहोचताच डॉक्टरांनी तिला तपासलं. डॉक्टरांनी तपासून आरोहीला मृत घोषित केले. लेकीचा मृत्यू झाल्याचं ऐकून कुटुंबाने एकच टाहो फोडला. या दुर्दैवी घटनेमुळे तिच्या कुटुंबियांसह संपूर्ण परिसरात एकच हळहळ व्यक्त होत आहे.

## जम्मू-काश्मीरमध्ये मुसळधार पावसामुळे हाहाकार; चिमुकल्यांसह तिघांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्रीनगर : जम्मू आणि काश्मीरमध्ये मुसळधार पावसामुळे हाहाकार माजला आहे. पावसाची संततधार आणि ढगफुटीच्या घटनेने भीषण स्थिती निर्माण झाली आहे. पुरामुळे दोन चिमुकल्यांसह तिघांचा मृत्यू झाला आहे. भारतीय लष्कर आणि प्रशासकीय पथकांनी बचाव कार्य सुरु केले असून १००हून अधिक लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवले आहे.

जम्मू श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या भूस्खलनामुळे वाहतुकीलाही मोठा फटका बसला आहे. रामबनचे एसएसपी कुलबीर सिंह यांनी माहिती दिली की, महामार्ग पाच ठिकाणी बंद



करण्यात आले आहे. हवामानाची स्थिती पूर्वपदावर येताच वाहतूक सुरळीत होणार आहे.

राज्यातील रामबनमधील सारी बागना गावात ढगफुटीची दुर्घटना घडली. यामध्ये आकिब अहमद आणि मोहम्मद साकिब या दोन चिमुकल्यांसह तीन जणांचा मृत्यू झाला आहे. यासोबतच धरम कुंडमध्येही पुरस्थिती ओढावली, ज्यामध्ये ४० घरांचे नुकसान झाले आहे. यातील १० घर पूर्णपणे उद्धवस्त झाली आहेत. तर उर्वरित घराचे अंशतः नुकसान झाले आहे. जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री यांच्या कार्यालयाकडून रामबनमधील या प्रलयाबद्दल दुःख व्यक्त करण्यात आले आहे. त्यांनी अधिकृत निवेदनात म्हटले आहे की, परिस्थिती पूर्वपदावर आणण्यासाठी मदत आणि दुरुस्ती योजनांचा आढावा घेतला जाईल.

या घटनेत झालेल्या जीवितहानीबद्दल उपराज्यपाल मनोज सिन्हा यांनीही तीव्र दुःख व्यक्त केले आहे. ते म्हणाले की, जिल्हा प्रशासन, एसडीआरएफ आणि इतर बचाव पथके वेगाने मदतकार्य करण्यासाठी गुंतली आहेत. 'सर्व बाधित कुटुंबांना शक्य तितकी मदत केली जात आहे.' असेही सिन्हांनी नमूद केले आहे.


**विदर्भात वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड संस्थेचे सहकार्य** — **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

## मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन यशस्वीतेसाठी शासन कटीबद्ध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : नागरिकांचे आरोग्य प्राधान्यक्रमावर ठेवून नागरिकांच्या आरोग्यविषयक अनेकविध योजना शासनामार्फत सुरू करण्यात आल्या आहेत. वयस्क लोकांमध्ये मोतीबिंदूमुळे येणारी दृष्टिहीनता टाळण्यासाठी मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन यशस्वी करण्यासाठी राज्य शासन कटीबद्ध आहे. शासनाचे हे मिशन पूर्णत्वास नेण्यासाठी वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड या संस्थेने सर्वतोपरी सहकार्यासाठी पुढाकार घेतला आहे, ही कौतुकास्पद बाब आहे, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले आहे.

मोतीबिंदूमुळे येणारी दृष्टिहीनता आणि त्यावर उपाययोजना म्हणून २०१७ पासून मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन सुरू आहे. शासनाने हाती घेतलेल्या या मिशनची २०१८ मध्ये नव्याने सुरुवात करण्यात



आली आहे. येत्या २०२७ पर्यंत हे मिशन यशस्वीपणे राबविण्याच्या दृष्टिने विदर्भात वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (थउङ) ही संस्था इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय (आयजीएमसी), नागपूर यांना मदत करत आहे. डब्ल्युसीएल या संस्थेच्या माध्यमातून आयजीएमसी, नागपूर यांनी गेल्या वर्षभरात साधारण चार हजार मोतीबिंदूच्या शस्त्रक्रीया केल्या आहेत. तसेच शासनासोबत केलेल्या कराराच्या माध्यमातून मुख्यमंत्री यांच्या मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन स्वप्नपूर्तीसाठी वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडने संपूर्ण विदर्भात विविध उपक्रम राबवून यापुढील तीन वर्षात दरवर्षी साधारण चार हजार मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यासाठी देखील ही संस्था सहकार्य करणार आहे.

ही संस्था विदर्भातील ग्रामीण भागामध्ये शिबीर घेऊन ज्यांना मोतीबिंदू आहे त्या रुग्णाचे निदान करून त्यांना रुग्णालयामध्ये पोहोचवून त्यांच्यावर मोफत उपचार करतील. तसेच या मार्फत रुग्णालयांना आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देतील. डब्ल्यूसीएल संस्थेचे मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशनच्या यशस्वीतेसाठी शासनाला असलेले सहकार्य पाहून इतर स्वयंसेवी संस्था देखील या कामात पुढाकार घेतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

## कर्नाटकचे माजी पोलिस महासंचालक ओम प्रकाश यांची राहत्या घरात हत्या



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बेंगळुरू: कर्नाटकचे माजी पोलीस महासंचालक (डीजीपी) ओम प्रकाश यांची हत्या करण्यात आली आहे. रविवारी (२० एप्रिल) संध्याकाळी बेंगळुरूमधील एचएसआर लेआउटमध्ये ही घटना घडल्याची माहिती आहे. त्यांची पत्नी पल्लवीनेच त्यांची हत्या केल्याचं बोललं जात आहे. कौटुंबिक वादातून पत्नीने त्यांची हत्या केल्याची माहिती आहे. या घटनेनंतर पत्नीने स्वतः पोलिसांना याबाबतची माहिती दिली. राज्य पोलीस विभागाचे प्रमुख असलेल्या अधिकाऱ्याच्या हत्येने सर्वांनाच धक्का बसल्याचं एका अधिकाऱ्याने सांगितले आहे. ६८ वर्षीय ओम प्रकाश निवृत्तीनंतर बेंगळुरूमध्ये त्यांच्या राहत्या घरी राहायचे. त्यांचा पत्नीशी काही कारणावरुन वाद सुरू होता. मानसिक संतुलन बिघडलेल्या पत्नीने रविवारी सायंकाळी ओमप्रकाश यांची हत्या केली आणि त्यानंतर पोलिसांना याबाबत माहिती दिली, अशी माहिती आहे. या प्रकरणी एचएसआर लेआउट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी होसूर रोडवरील सेंट जॉन हॉस्पिटलमध्ये नेण्यात आला आहे.

१९८१ च्या बॅचचे ६८ वर्षीय आयपीएस अधिकारी बिहारमधील चंपारणचे मूळ रहिवासी होते आणि त्यांनी भूगर्भशास्त्रात एमएससी पदवी प्राप्त केली होती. त्यांनी अग्निशमन दल आणि होमगार्डचे डीजीपी म्हणून काम केले होते. १ मार्च २०१५ रोजी त्यांची पोलीस महासंचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. ओमप्रकाश यांची हत्या केल्यानंतर पत्नीने स्वत: पोलिसांना फोन करून याबाबतची माहिती दिली.



## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सोलापूर जिल्हा दौरा

सोलापूर (जिमाका) : राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सोमवार दि. २१ एप्रिल २०२५ रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सोमवार दि.२१ एप्रिल २०२५ रोजी दुपारी १२.१५ वाजता सोलापूर विमानतळ येथे आगमन व हेलिकॉप्टर ने माढा जिल्हा सोलापूर कडे प्रयाण . दुपारी १२.४५ वा. रयत शिक्षण संस्था मैदान हेलिपॅड माढा येथे आगमन व मोटारीने शेटफळ रोड ता. माढा कडे प्रयाण. दुपारी ०१.०० वा. राजीव ग्रो ऑईल इंडस्ट्रीज प्रा. लि. भूमिपुजन सोहळ्यास उपस्थिती. दुपारी ०१.३० वा. शिवसेना पक्षाची जाहिर सभा व मेळाव्यास उपस्थिती. दुपारी ०२.४५ वा . मोटारीने रयत शिक्षण संस्था मैदान हेलिपॅड कडे प्रयाण. दुपारी ०३.०० वा. रयत शिक्षण संस्था मैदान हेलिपॅड येथे आगमन व हेलिकॉप्टरने सोलापूर विमानतळा कडे प्रयाण. दुपारी ०३.३० वा सोलापूर विमानतळ येथे आगमन व शासकीय विमानाने मुंबई कडे प्रयाण करतील.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### पीजीआरएस प्रणाली

विविध कार्यक्रमांमध्ये तसेच येथील सव्हिल लाईन्स परिसरातील मुख्यमंत्री सचिवालय-हैदराबाद हाऊसमध्ये प्राप्त होणारे जनतेचे अर्ज व निवेदनांवर सकारात्मक कार्यवाही होवून या अर्जाची सद्यस्थिती अर्जदाराला एसएमएसद्वारे कळण्यासाठी पब्लिक ग्रिव्हेन्सेस रिडर्रसल सिस्टिम (पीजीआरएस) ही ऑनलाईन प्रणाली लवकरच कार्यान्वित होणार आहे. नुकतीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुख्यमंत्री सचिवालयात या संदर्भात बैठक झाल्याने यामुळे नागरिकांच्या अडीअडचणींचा लवकरच निपटारा होईल. शासकीय कामकाजामध्ये तंत्रज्ञानाचा वापर करून जनतेला तात्काळ दिलासा देण्याचे राज्य शासनाचे धोरण आहे. यास अनुसरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर दौऱ्यावेळी व येथील मुख्यमंत्री सचिवालयात विविध विभागांशी व विषयांशी संबंधित निवेदने, अर्ज व तक्रारी संबंधित विभागाकडे पाठवून त्यावर उचित कार्यवाही होण्याच्या दृष्टीने पीजीआरएस ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात आली आहे. मुख्यमंत्री सचिवालयाच्या विशेष कार्यधिकारी आशा पठाण यांनी या ऑनलाईन प्रणाली विषयी सविस्तर सादरीकरण केले होते. या ऑनलाईन प्रणालीद्वारे प्राप्त निवेदने व अर्जांचे विभागनिहाय व तक्रारनिहाय वर्गीकरण करण्यात येईल. हे अर्ज व निवेदने स्कॅन करून संबंधित विभागाला आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात येईल व त्याची माहिती एसएमएसद्वारे अर्जदाराला कळेल. संबंधित विभागाकडे पाठपुरावा करण्यात येवून अर्जदाराचा अर्ज निकाली काढल्याबाबत अर्जदारास एसएमएसद्वारे माहिती मिळेल. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या ऑनलाईन प्रणालीबाबत समाधान व्यक्त केले. लवकरच ही सुविधा जनेतेचा सेवेत रूजू होणार आहे.

# वेव्हज २०२५ : भारतासाठी जागतिक कंटेंट हब बनण्याची सुवर्णसंधी!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जागतिक ऑडिओ-व्हिज्युअल आणि मनोरंजन क्षेत्रातील महत्त्वपूर्ण पर्व ठरणारी 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल ॲण्ड एंटरटेनमेंट समिट (WAVES) 2025' अवघ्या दोन आठवड्यांवर येऊन ठेपली आहे. १ ते ४ मे २०२५ दरम्यान मुंबई येथील जिओ कन्व्हेशन सेंटर, बीकेसी येथे होणारी ही भव्य समिट, भारताला जागतिक पातळीवर 'कंटेंट सुपरपॉवर' म्हणून ओळख मिळवून देण्यासाठी एक सुवर्णसंधी ठरणार आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दृष्टिकोनानुसार भारताने क्रिएटिव्ह इकॉनॉमीमध्ये आघाडी घेत असून नेहमीप्रमाणे मुंबईने क्रिएटिव्ह इकॉनॉमीचे नेतृत्व करायला तयार आहे. WAVES 2025 ही केवळ एक शिखर परिषद नाही, तर भारताच्या सर्जनशील शक्तीला, जागतिक गुंतवणुकीला आणि धोरणात्मक बदलांना चालना देणारा परिवर्तनशील क्षण आहे. भारताने याचा उपयोग करून जागतिक कंटेंट क्षेत्रावर आपला ठसा उमटवावा, अशी सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांची अपेक्षा आहे.

**WAVES 2025: का आहे ही परिषद खास?**

भारतामध्ये माध्यम आणि मनोरंजन (Media Entertainment - M&E) उद्योग हा वेगाने प्रगत होत असलेला आणि रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने महत्त्वाचा घटक आहे. OTT, ॲनिमेशन, गेमिंग, VFX, चित्रपट, संगीत, आणि डिजिटल मीडिया क्षेत्रात भारताने गेल्या दशकात विक्रमी प्रगती केली आहे. FICCI-EY रिपोर्टनुसार, २०२४ मध्ये भारतीय चए उद्योगाची किंमत २८ अब्जच्या पुढे गेली असून, २०२५ पर्यंत तो ३४ अब्ज गाठेल असा अंदाज आहे.

याच पार्श्वभूमीवर WAVES 2025 ही परिषद केवळ चर्चासत्रांचे व्यासपीठ नसून, भारतातील सृजनशील उद्योगक्षेत्राला जगभरातील गुंतवणूक, सहकार्य, आणि नवकल्पनांशी जोडणारा सेतू ठरणार आहे.

**भारत – सृजनशील महासत्ता होण्याच्या वाटेवर**

भारतात सध्या दरवर्षी २,००० पेक्षा अधिक चित्रपट तयार होतात, ज्यात २० पेक्षा अधिक प्रादेशिक भाषा समाविष्ट असतात. OTT प्लॅटफॉर्मवर भारतीय कंटेंटची मागणी केवळ देशातच नव्हे तर अमेरिका, युरोप, मिडल ईस्ट आणि दक्षिण आशियाई देशांमध्येही वाढत आहे. या मागणीचा फायदा घेत, भारताने 'कंटेंट एक्स्पोर्ट हब' होण्यासाठी पावले उचलणे ही काळाची गरज बनली आहे. थतएड २०२५ या दिशेने एक निर्णायक टप्पा ठरेल. ही परिषद केवळ संवादाचा नव्हे, तर कृतीशील धोरणनिर्मितीचा केंद्रबिंदू ठरेल, जिथून भारताची M&E क्षेत्रातील भविष्यातील दिशा ठरवली जाईल.

ऑस्कर, कान्स, वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम, दावोसच्या धर्तीवर वेव्हजचेही दरवर्षी आयोजन

वेव्हज् ही परिषद केंद्र आणि राज्य शासनाच्या सहकार्याने होत आहे. वेव्हजला कायमस्वरूपी एक सचिवालय स्वरूपात पुढे नेण्यात येणार आहे. या परिषदेस एक कायमस्वरूप देऊन दरवर्षी हा कार्यक्रम घेतला जाणार आहे. ज्याप्रमाणे ऑस्कर, कान्स किंवा दाओस येथील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम सारखा आंतरराष्ट्रीय दर्जाचे आयोजन केले जाते, अगदी त्याचप्रमाणे वेव्हज याचेही दरवर्षी आयोजन केले जाणार आहे. यासाठी एक समर्पित टीम वर्षभर काम करणार आहे.

**वेव्हज परिषदेस १०० पेक्षा जास्त देश होणार सहभागी**

सध्या तंत्रज्ञानाचे युग असून ते बदलणारे आहे. या नवीन बदलत्या तंत्रज्ञानाचे नेतृत्व महाराष्ट्राने करावे, यावर जोर देण्यात येत आहे. दृकश्राव्य तसेच मंनोरंजन क्षेत्रात क्रियेटिव्ह इकॅानॉमीला एक प्लॅटफॉर्म देण्यात येणार आहे. मुंबई येथे होणाऱ्या या वेव्हज परिषदेस १०० पेक्षा जास्त देश सहभागी होणार आहेत. हा कार्यक्रम यापूर्वी झालेल्या जी २० पेक्षा खूप मोठा असणार आहे.

**WAVES समिटची वैशिष्ट्ये आणि महत्त्वाचे घटक:**

"Create in India' **वर भर:** "Make in India' पाठोपाठ आता "Create in India' ही नवी संकल्पना थतएड समिटद्वारे आंतरराष्ट्रीय पातळीवर पुढे नेली जाईल.

सर्जनशील प्रतिभेला व्यासपीठ: भारतातील प्रादेशिक भाषांतील कंटेंट, ॲनिमेशन आणि गेमिंग क्षेत्रातील नवोदित निर्माते आणि कलाकारांना जागतिक प्लॅटफॉर्मवर आपली कला सादर करण्याची संधी.

ग्लोबल सहयोग आणि भागीदारी: Netflix, mazon, Disney+, Sony Pictures यांसारख्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांसोबत भागीदारीसाठी मार्ग मोकळे होतील.

तंत्रज्ञान आणि नवोन्मेष यांचा संगम: AI, वर्च्युअल प्रोडक्शन, आणि इंटरॅक्टिव कंटेंटसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर सखोल चर्चा.

धोरणात्मक चर्चासत्रे: धोरणकर्ते, गुंतवणूकदार, कलाकार, तंत्रज्ञ आणि उद्योगपती यांच्यात थेट संवादाची संधी.

क्रिएट इन इंडिया चॅलेंज – जगभरातील नवोदित निर्मात्यांच्या प्रतिभेचा अविष्कार साजरा करणारा एक अभूतपूर्व उपक्रम, अर्थात मुंबईत होणाऱ्या वेव्हज २०२५ मध्ये आपल्या प्रतिभेची झलक दाखवण्यासाठी 'वेव्हज' हे एक आघाडीचे व्यासपीठ म्हणून सज्ज आहे.

वेव्हेक्स २०२५ – हा उपक्रम एक मैलाचा दगड ठरणारा असून यामाध्यमातून मीडिया-टेक स्टार्टअप्स त्यांच्या नवकल्पना आघाडीच्या उद्योग धुरिणांसमोर आणि सेलिब्रिटी एंजल गुंतवणूकदारांसमोर सादर करतील, ज्यामुळे भारताच्या माध्यम आणि मनोरंजन परिसंस्थेच्या भविष्याला नवीन दिशा मिळेल.

वेव्हज बाजार: चित्रपट, गेमिंग, संगीत, जाहिरात आणि एक्सआर, निर्माते, गुंतवणूकदार आणि इतर व्यवसायांना जोडणारी एक अद्वितीय जागतिक बाजारपेठ. यातूनच उद्योग व्यावसायिकांना उत्पन्नाचे नवीन स्रोत उघडण्याच्या संधी देखील देते.

मास्टरक्लासेस आणि परस्परसंवादी सत्रे – उद्योगातील दिग्गज आणि जागतिक नेत्यांकडून शिकण्याची, माध्यम, मनोरंजन आणि तंत्रज्ञानाच्या भविष्याबद्दल अंतर्दृष्टी मिळविण्याची एक दुर्मिळ संधी.

**– वर्षा फडके आंधळे, वरिष्ठ सहायक संचालक (नव माध्यम)**

## शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवणूक करण्याचे आमिष दाखवून फसवणूक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवणूक केल्यास प्रति महिना आठ टक्के परतावा देतो असे अमिष दाखवून फिर्यादी रोहित सतीश खारवे (वय-३२,रा. गुरुकृपा अपार्टमेंट, उत्तर कसबा शिवाजी चौक, सोलापूर) यांचा विश्वास संपादन करून त्यांच्याकडून रक्कम घेऊन त्या बदल्यात डिसेंबर २०२३ पर्यंत परतावा म्हणून सहा लाख रुपये दिले.त्यानंतर आजतागायापर्यंत यासीन दाऊद बागवान (रा.आडम प्लॉट,श्रम जीवी नगर) याने दिलेल्या पैशाच्या ठरल्याप्रमाणे परतावा किंवा रक्कम परत न करता फसवणूक केली आहे.याप्रकरणी रोहित खारवे यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून यासीन बागवान यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना जानेवारी २०२४ ते १९ एप्रिल २०२५ रोजी दरम्यान घडली.

या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव हे करीत आहेत.

## श्री शंकर साखर कारखान्याच्या वतीने शेतकऱ्यांसाठी ए.आय मार्गदर्शन शिबिर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

माळशिरस/प्रतिनिधी : श्री शंकर सहकारी साखर कारखाना लि. सदाशिवनगर या कारखान्याच्या वतीनेऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी ए आय शिबिर मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

मा.नामदार श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब, मुख्यमंत्री* महाराष्ट्र राज्य यांचे *१००* दिवसीय कृती आराखड्यानुसार ऊस विकास योजणे अंतर्गत ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी ए आय तंत्रज्ञान व ऊस उत्पादन वाढीचे आधुनिक तंत्रज्ञान कार्यशाळेचे उदघाटन कारखाना कार्यस्थळावर महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री *मा.श्री. विजयसिंह मोहिते – पाटील यांचे हस्ते संपन्न झाले.

कारखान्याचे चेअरमन विधान परिषेदेचे आमदार रणजितसिंह मोहिते – पाटील यांचे मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे अध्यक्ष माढा मतदार संघाचे खासदार मा. श्री. धैर्यशिल मोहिते – पाटील. कार्यक्रमाची प्रमुख उपस्थित आमदार मा.श्री. उत्तमराम जानकर विधानसभा सदस्य माळशिरस ,कारखान्याचे व्हॉइस चेअरमन श्री मिलिंद कुलकर्णी. माळशिरस पंचायत समितीचे माजी उपसभापती मा. श्री.अर्जुनसिंह मोहिते – पाटील,मा. श्री. विश्वतेजसिंह रणजितसिंह मोहिते – पाटील. शेतकऱ्यांना ऊस पिकावर मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. श्री. संतोष




करंजे* (विशेषज्ञ मुदाशास्त्र विभाग ,कुषी विज्ञान केंद्र,बारामती ) ऊस पिकासाठी कुत्रिम बुद्धीमत्तेचा ( ए आय तंत्रज्ञान)वापर

डॉ.श्री. समाधान सुरवसे (शास्त्रज्ञ वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, मांजरी -पुणे ) ऊस उत्पादन वाढीचे आधुनिक तंत्रज्ञान यांनी एकरी ऊस उत्पादन वाढविणे साठी अनमोल मार्गदर्शन केले पारंपारिक शेती पद्धतीत बदल करीत आधुनिक तंत्रज्ञानाशी सांगड घालणे त्यातून उत्पादन क्षमतेत लक्षणीय वाढ साधता येईल ए आय च्या मदतीने शेतकरी अधिक शास्त्रशुद्ध आणि निर्णयक्षम शेती करू शकतील तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता ( ए आय ) तंत्रज्ञानाच्या साह्याने ऊस पिक जोमात पिकवता येते व त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा नफा मिळवता येतो तर साखर कारखान्याचे साखर उताऱ्यात (रिकव्हरी) मध्ये मोठा फरक पडू शकतो असा विश्वास कृषी विज्ञान केंद्राचे विशेष तज्ञ डॉक्टर संतोष करंजे यांनी व्यक्त केले परिसंवादास पंचायत समितीचे माजी सदस्य, सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील कारखान्याचे संचालक ,शिवामृत दूध उत्पादक संघाचे संचालक , कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक, श्री शंकर कारखान्याचे संचालक मंडळ, ऊस उत्पादक शेतकरी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते तसेच कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री स्वरूप देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री अभिजीत डुबल, जनरल मॅनेजर श्री रविराज जगताप व अधिकारी खाते प्रमुख ,विभाग प्रमुख व कर्मचारी उपस्थित होते सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्हॉ चेअरमन श्री मिलिंद कुलकर्णी यांनी केले व संचालक सुरेश पाटील यांनी आभार मानले.

**मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पात्र महिलांना ५० पिंक ई-रिक्षांचे वितरण**

**मुख्यमंत्र्यांनी केला पिंक ई-रिक्षातून प्रवास**

# पिंक ई-रिक्षा हे महिला सक्षमीकरण आणि सुरक्षेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### मुख्यमंत्र्यांनी केला पिंक- ई-रिक्षातून प्रवास

**कार्यक्रम संपल्यानंतर मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी नागपुरातील सन्याल नगर, टेका नाका नारीरोड येथील पूजा नरेंद्र वानखेडे यांच्या पिंक ई रिक्षातून महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे आणि राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्यासह प्रवास केला. या पिंक ई रिक्षाचे पहिले प्रवासी होण्याचा मान मिळवत त्यांनी महिलांना विश्वासही दिला.**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : महाराष्ट्र शासनाने महिला सक्षमीकरणाच्या दिशेने विविध निर्णय घेतले असून त्याची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. महिला व बाल विकास विभागाच्यावतीने महिलांद्वारे महिलांसाठी संचालित पिंक ई-रिक्षा योजनेच्यामाध्यमातून महिला सक्षमीकरण आणि त्यांच्या सुरक्षेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडल्याचे प्रतिपादन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले. लाभार्थी महिलेच्या पिंक ई-रिक्षातून प्रवास करत त्यांनी महिलांना कृतिशील विश्वासही दिला.







राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्यावतीने येथील नियोजन भवनात आयोजित कार्यक्रमात पिंक ई-रिक्षा योजनेअंतर्गत नागपूर जिल्ह्यातील ५० पात्र महिला लाभार्थ्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पिंक ई-रिक्षा वितरित करण्यात आल्या, त्यावेळी ते बोलत होते. महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, आमदार संदीप जोशी आणि डॉ. आशिष देशमुख, महिला व बालविकास विभागाचे सचिव डॉ. अनुप कुमार यादव, महिला व बाल विकास आयुक्त नयना गुंडे, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, महिला सक्षमीकरणासाठी राज्य शासन कटिबद्ध असून विविध योजनांच्या माध्यमातून हे कार्य प्रभावीपणे सुरू आहे. महिला व बालविकास विभागाने पिंक ई-रिक्षा या महत्वाकांक्षी योजनेच्या माध्यमातून गरजू महिलांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. तसेच कामकाजी महिलांना या महिलांच्या ऑटो रिक्षामध्ये बसून सुरक्षित प्रवास करण्याची हमीही या योजनेने दिली आहे. नागपूर जिल्ह्यातील ५० पात्र लाभार्थी महिलांना ई-रिक्षा वितरित झाल्या असून जिल्ह्यात २ हजार महिलांना या योजनेअंतर्गत ई-रिक्षा वितरीत होवून रोजगार उपलब्ध होणार आहे.

नागपूर शहरातील विविध मेट्रो स्टेशनवर प्रवाशांना फिडरसेवा उपलब्ध करून देण्यासाठी महिला व बाल विकास विभाग आणि महामेट्रो दरम्यान करार झाला आहे. यातून पिंक ई-रिक्षाधारक महिलांना हक्काचा रोजगार उपलब्ध होणार आहे. राज्याच्या पर्यटन विभागासह अन्य विभागासोबत भविष्यात असे करार करून या महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे म्हणाल्या, राज्य शासनाने महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महत्त्वाकांक्षी पिंक ई-रिक्षा ही योजना आणली आहे. राज्यातील आठ जिल्ह्यात ही योजना राबविण्यात येत असून पहिल्या टप्प्यात येत्या सहा महिन्यात पाच हजार रिक्षा वितरीत करण्याचे उद्दिष्ट आहे. नागपूर जिल्ह्यातील ५० पात्र महिला लाभार्थ्यांना ई -रिक्षा वितरित करून पहिल्या टप्प्यातील वितरणाची सुरुवात झाली आहे. या महिलांना किमान दहा दिवसांचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. पाच वर्षांचा रिक्षाचा मेंटेनन्स आणि चार्जिंगची व्यवस्था ही त्यांना करून देण्यात आली आहे. महामेट्रो सोबत करार करून फिडर सेवेअंतर्गत या महिलांच्या ई-रिक्षाची सेवा उपलब्ध होऊन त्यांना रोजगारही मिळणार आहे. येत्या काळात विमानतळ, पर्यटनस्थळ अशा ठिकाणीही पिंक ई-रिक्षा सेवा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते यावेळी प्रतिनिधिक स्वरूपात ११ पात्र महिला लाभार्थ्यांना ई-रिक्षाच्या चाव्या वितरित करण्यात आल्या.

महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महिला व बाल विकास विभागाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या महत्वाकांक्षी पिंक ई-रिक्षा योजनेअंतर्गत नागपूर जिल्ह्यात २००० पिंक ई-रिक्षा वितरित होणार आहेत. यासाठी २० ते ५० वर्षे वयोगटातील इच्छुक महिलांचे २०४० अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी जिल्हाधिकारी डॉ. इटनकर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने १०३२ लाभार्थ्यांना मंजुरी देण्यात आली आहे. यापैकी ५० पात्र लाभार्थी महिलांना पिंक ई-रिक्षा वितरित करण्यात आले.

**थोडक्यात योजनेविषयी**

राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्यावतीने महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने पिंक ई-रिक्षा ही महत्वाकांक्षी योजना राज्यातील आठ जिल्ह्यांकरीता राबविण्यात येणार आहे. यात नागपूर जिल्ह्यामध्ये २००० महिलांना पिंक ई-रिक्षा वाटप करण्याचे उद्दिष्ट दिलेले आहे. या योजनेंतर्गत पुणे, नाशिक, नागपूर, अहिल्यानगर, अमरावती, संभाजीनगर, सोलापूर, कोल्हापूर या जिल्ह्यांत महाराष्ट्र शासनाकडून इच्छुक महिलांना रिक्षा खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य व ई-रिक्षा चालवण्यासाठी सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### पेट्रोल पंपावरील रोख रक्कम अज्ञात इसमाने पळवली

सोलापूर, (प्रतिनिधी) : पेट्रोल पंपावरील दिवसभर जमा झालेली रक्कम मोजत असताना एका अनोळखी इसमाने सुट्टे पैसे मागण्याकरिता आला व मोजणी करत असलेली रोख रक्कम पैकी २५ हजार रुपये रोख रक्कम घेऊन चोरून नेल्याची फिर्यादी उमेश मल्लिनाथ वाडीकर (वय-५३,रा.कस्तुरचन्नम्मा नगर,सैफुल) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात इस्मविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना १६ एप्रिल रोजी दुपारी चार ते साडेचार वाजण्याच्या सुमारास साधून पेट्रोल पंप अक्कलकोट रोड येथे घडली.या घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक गायकवाड हे करीत आहेत.

### विवाहितेचा छळ घर; पतीसह सहा जणांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : विवाहिता ही सासरी नांदत असताना सासरकडच्या मंडळींनी वेळोवेळी फिर्यादी पद्मिनी रामदास




कोळेकर (वय-३८,रा. रोहिणी नगर भाग ३, जुळे सोलापूर) हिला सोने व पैसे न आणता फुकट आली आहेस म्हणून टोमणे मारून त्रास दिला आहे.तसेच घर बांधायला व गाडी घेण्याकरिता ८० हजार रुपये व तसेच रिक्षा घेण्याकरिता एक लाख रुपये घेऊन ये असे म्हणून क्रूर वागणूक दिल्याची फिर्याद पद्मिनी कोळेकर यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात दिली आहे. हि घटना १९ जून २०१९ ते आजतगायत पर्यंत मु.पोस्ट औंज येथे घडली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पती रामदास, सासू शांताबाई, यशवंत दीर रमेश (सर्व.रा.मुक्काम पोस्ट औंज तालुका दक्षिण सोलापूर) नंदेचा नवरा बलभीम टिळे (रा.मु.पोस्ट नांदणी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार गावडे हे करीत आहेत.

# प्रबुद्ध भारत तरुण मंडळातर्फे झोपाळ्यात माता रमाई-डॉ. आंबेडकरांचा लक्षवेधक देखावा

## दिमाखदार मिरवणुकीने स्फुल्लिंग चेतविले



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त प्रबुद्ध भारत तरुण मंडळ (पी.बी. ग्रुप ) यांच्या वतीने झोपाळ्यात समाज हिताची चर्चा करताना माता रमाई - डॉ. आंबेडकर तसेच छत्रपती शिवाजी महाराज छत्रपती शाहू महाराज महात्मा फुले साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे आणि डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यांचा भव्य देखावा सादर करण्यात आला.

या देखाव्यामध्ये हरणे बागडत असलेल्या सुंदर बागेत झोपाळ्यामध्ये एकमेकांशी समाज हिताची चर्चा करत असताना माता रमाई आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हा देखावा सर्वांचे लक्ष वेधून घेत होता. प्रमुख मार्गदर्शक माजी गटनेते तथा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांच्या मार्गदर्शनाखाली नेटक्या पद्धतीने ही मिरवणूक काढली.

रविवारी सकाळी ११.३० वाजता या मिरवणुकीची सुरुवात विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पोलीस आयुक्त एम राजकुमार आणि महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, अजित बोराडे, उद्योजक इंदरमल जैन, धूत सारीजचे पुरुषोत्तम धूत, मंडळाचे मार्गदर्शक माजी गट नेते आनंद चंदनशिवे, माजी नगरसेवक गणेश पुजारी , बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सवाचे अध्यक्ष विकी शेंडगे, रॉकी बंगाळे यांच्यासह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. दिमाखात ही मिरवणूक मार्गस्थ झाली.

यावेळी पी. बी. ग्रुप प्रमुख गौतम चंदनशिवे, प्रतीक चंदनशिवे, उत्सव अध्यक्ष बाबा गायकवाड, कार्याध्यक्ष प्रथमेश सुरवसे, धीरज वाघमोडे, एस. के. फाउंडेशनचे संस्थापक रविकांत कोळेकर, उपाध्यक्ष महेश श्वाके, सचिव सिद्धांत तळभंडारे, खजिनदार रवी मॅंतरोलु ,श्रीमंत जाधव, अॅड. विशाल मस्के आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दरम्यान, यावेळी पोलीस आयुक्त एम राजकुमार यांनी मंडळाच्या देखाव्याचे कौतुक केले. सर्वांनी शिस्तबद्ध रित्या शांततेत मिरवणूक काढण्याचे आवाहन करताना शुभेच्छा दिल्या. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनीही सर्व समाज बांधवांना शुभेच्छा दिल्या.

### आदर्श घेण्यासारखा देखावा : आनंद चंदनशिवे

**विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मंडळाच्या वतीने शिस्तबद्ध मिरवणूक काढण्यात आली. डॉ. आंबेडकर हयात असताना पासून सोलापूर शहरात मिरवणुकीची परंपरा आहे. त्यामुळे आमच्या मंडळाने समाजाला आदर्श वाटेल असा देखावा सादर केला आहे. सर्व जाती - धर्माचे लोक या मिरवणुकीत उत्स्फूर्तपणे आणि उत्साहाने सहभागी होतात, असे यावेळी मार्गदर्शक आनंद चंदनशिवे यांनी सांगितले.**

# जी.एम मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेचा अखंड पृथ्वीतलावर भारतीय संविधान सर्वश्रेष्ठ असणारा फिरता देखावा सादर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) : डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची १३४ व्या जयंती निमित्त सोलापूर शहरांमध्ये मानाची भीम जयंती म्हणून आ-ळख आसलेल्या जी.एम मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने संविधानाच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने अखंड पृथ्वीतलावर भारतीय संविधान सर्वश्रेष्ठ असणारा फिरता देखावा सादर करण्यात आला भारताचे संविधान हा देशाचा सर्वोच्च कायदेशीर दस्तावेज आहे, जो २६ नोव्हेंबर १९४९ रोजी स्वीकारला गेला आणि २६ जानेवारी १९५० रोजी लागू झाला. हे संविधान भारताला एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक म्हणून स्थापित करते आणि नागरिकांच्या हक्कांची आणि जबाबदाऱ्यांची व्याख्या भारतीय संविधान करते भारतीय संविधानाच्या ५द्ध५द्ध व्या अमृत महोत्सवा निमित्त भारतीय संविधान जागृती करणारा देखावा सादर करण्यात आला. या देखाव्याचे उदघाटन कर्तव्यदक्ष पोलीस आयुक्त एम राजकुमार साहेब पोलीस उपायुक्त विजय कबाडे याचा हस्ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सामुदायिक बुद्ध वंदना घेऊन अभिवादन करून मिरवणुकी सुरुवात करण्यात आली यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, गुरुशांत धुतरगावकर, पोलीस उप आयुक्त बोराडे साहेब जी.एम सस्थेचे सस्थापक बाळासाहेब वाघमरे जी.एम संस्थेचे आधारस्तंभ दत्ताभाऊ वाघमारे जी.एम संस्थेचे उत्सव अध्यक्ष अझहर शेख राजू हौशेट्टी बाळासाहेब गायकवाड विजय छंचुरे शशिकांत उर्फ पप्पू गायकवाड राजु माने दत्ता शिंदे संजय पोळ आप्पासाहेब बागले यांच्या सह जीएम संस्थेचे शेकडो पदाधिकारी भीमसैनिक उपस्थित होते.

# ‘आदिनाथ’वर आमदार नारायण पाटील गटाची एक हाती सत्ता; मा.आ. संजय शिंदेसह पूर्ण पॅनल पराभूत



पंढरपूर/प्रतिनिधी : करमाळा तालुक्यातील आदिनाथ सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीसाठी झालेल्या दुरंगी लढतीत विद्यमान आमदार नारायण पाटील यांच्या आदिनाथ संजीवनी विकास पॅनलचे सर्वच्या सर्व उमेदवार निवडून आले असून महायुतीच्या आदिनाथ बचाव पॅनलचे प्रमुख माजी आमदार संजय मामा शिंदे यांच्यासह पूर्ण पॅनलचा पराभव झाला आहे.

निवडणूक लढवून ९४६२ मते मिळवली तर माजी आमदार संजय शिंदे यांनी व्यक्त केली उत्पादक गेम गटातून ही निवडणूक लढवून ७० ६० मते मिळवली शनिवारी सकाळी लवकरच मतमोजणी प्रक्रियेत सुरुवात झाली असली तरी मतपत्रिकेवर मतदान असल्याने प्रथम मतपत्रिकेचे गट्टे तयार करण्यात आले व त्यानंतर सर्वप्रथम सोसायटी मतदारसंघातून डॉक्टर हरिदास केव्हा रे यांचे विजयी घोषणा करण्यात आली आणि पाटील गटाच्या विजयाने श्री गणेशा झाला. त्यानंतर सर्वच्या सर्व गटातून आणि विविध प्रवर्गातून आमदार नारायण पाटील यांच्याच उमेदवारांनी आघाडी घेत आदेण्याचा गड काबीज केला. . डॉक्टर अमोल घाडगे अँड राहुल सावंत आणि देवानंद बागल यांचे गटातून वसंतांबरे रविकिरण फुके आणि दशरथ हजारे, केम गटातून दत्तात्रय देशमुख महेंद्र पाटील आणि विजय नवले, जेऊर गटातून दत्तात्रेय गव्हाणे महादेव पोरे आणि श्रीमान चौधरी, पोमलवाडी गटातून किरण कवडे नवनाथ जवळ आणि संतोष पाटील हे सर्वजण १००० ते १७०० पर्यंतच्या फरकाने निवडून आल्या यासोबत भटक्या विमुक्त जाती जमाती विशेष मागास प्रवर्ग प्रतिनिधी म्हणून आमदार नारायण पाटील तर मागासवर्गीय जातीच्या प्रतिनिधी म्हणून दादासाहेब पाटील तर अनुसूचित जाती अनुप जमाती प्रतिनिधीमध्ये मन राजेंद्र कदम हे निवडून आले आहेत राधिका तळेकर आणि उर्मिला सरडे यांची महिला राखीव प्रतिनिधी म्हणून वर्णिले लागले आहे.

# राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या धाराशिव जिल्हाध्यक्षपदी अनंत फुलसुंदर यांची निवड



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क.

धाराशिव/प्रतिनिधि सुधाकर रणदिवे : राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या जिल्हा कार्यकारिणीची निवड सभा तुळजापूर येथील पंचायत समिती सभागृहात पार पडली. या सभेमध्ये संघटनेचे मार्गदर्शक माजी शिक्षक आमदार श्री.बाळाराम पाटील साहेब, कायदेशीर सल्लागार राज्य मागासवर्गीय आयोग महाराष्ट्र राज्याचे माजी सदस्य आदरणीय बी.एल. सगर किल्लारीकर साहेब यांच्या मार्गदर्शनानुसार तसेच संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपले प्रदेश सरचिटणीस संतोष भोजने यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा कार्यकारिणीची सभा होऊन यामध्ये अनंत फुलसुंदर यांची संघटनेच्या धाराशिव जिल्हाध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली.

या निवडीबद्दल जिल्हाभरातुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या जिल्हा निहाय शाखा तयार होत असताना धाराशिव जिल्ह्याला हा पहिला मान मिळाला याबद्दल धाराशिव वासियांनी संघटनेचे आभार मानले. तसेच जिल्हामध्ये तालुका निहाय शाखा काही कालावधीतच गठीत करू असे नूतन जिल्हाध्यक्ष अनंत फुलसुंदर आपल्या भाषणात म्हणाले.. संघटना ही बहुजन हितासाठी कटिबद्ध असून बहुजनांच्या,विध्यार्थ्यांना, शिक्षकांना आपल्या संविधानिक मागण्यासाठी खुले व्यासपीठ म्हणून काम करणार असल्याचे व बहुजनांच्या संघर्षासाठी, न्यायासाठी बहुजनांचे शिक्षण वाचवण्यासाठी संघटनेमध्ये सर्वांनी सक्रियपणे सहभाग नोंदवावा असे प्रदेश सरचिटणीस संतोष भोजने म्हणाले, आपली संघटना श्रमिक संघाकडे नोंदणीकृत असून महाराष्ट्र मधील सर्व जिल्ह्यांमध्ये संघटना शाखा स्थापन करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून राज्यातील सर्व ओबीसी बहुजन शिक्षकांनी संघटनेचे पद घेऊन संघटनेचे कार्य करावे असे आवाहन संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपल्ले यांनी केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक तथा सूत्रसंचालन सुखदेव भालेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन संतोष भोजने यांनी मानले, सभेला राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाचे प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपल्ले, राज्यसरचिटणीस संतोष भोजने,राज्य उपाध्यक्ष सुखदेव भालेकर, राज्य सल्लागार अभय पाटील, लातूर जिल्हाध्यक्ष हिरालाल पाटील, ओबीसी लढवय्ये दयानंद जवळगावकर, हर्षवर्धन माळी, सोमनाथ जामगावकर, दिगंबर हुंडेकरी, आण्णा दळवी, सुरेश राऊत, सचिन राऊत, अशोकराव खडके,पंकज काटकर, अशोक चव्हाण, ज्योतिर्लिंग क्षीरसागर, आदी पदाधिकारी उपस्थित होते.

**सामाजिक संदेशासह पायाची दुखापत केली बरी** प्रथमोपचार केले

# पक्षीमात्रांवर प्रेम करा यासह निवासी शाळेतील विद्यार्थ्यांनी पक्ष्याला दिले जीवनदान....!




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोंदिया/प्रतिनिधी : शहराला लागून असणारी नंगपुरामुर्री येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा या भर उन्हाचे दिवस असताना शालेय परिसरात एक नवीन जातीचे लहान आकाराचे पक्षी जखमी अवस्थेत आढळले. पाणी पाजून, त्या पक्षाला प्रथमोपचार करून त्याला जीवदान दिले. ते पक्षी विद्यार्थ्यांना दिसले असता शाळेतील शिक्षक मुन्नाभाई नंदागवळी यांनी त्या पक्षाला उचलून पाणी पाजले. गर्द छायेत घेऊन त्यावर मलमपट्टी लावून, पक्षाच्या पायाला दुखापत असता त्यावर औषध उपचार करून बरे केले. यावेळी विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

पक्षी हा वेगळ्या जातीचा असला तरी, तो एक जीव आहे. यासंदर्भात तथागत भगवान बुद्ध दिलेल्या पंचशिलेत म्हणतात. प्राणी व पक्षीमात्रांवर दया करा. प्रेम करा. हे खरे मंगल आहे. हा दाखला घेऊन शाळेतील शिक्षक व विद्यार्थी यांनी आज एका पक्षाला जीवनदान देऊन सामाजिक संदेश दिला.

यावेळी संमंथ भोवते, मोहित उईके, मयंक वालदे, अंश राऊत, अथर्व चौधरी, रोहन बोदेले, आदित्य भैसारे, घनश्याम जांभूळे, श्रेयश नंदेश्वर, रौनक अंबादे, अमन शहारे, वैभव वंजारी यांनी पक्षी वाचविण्यासाठी शिक्षकासह प्रयत्न केले. असे कार्य सर्वांनी करावे असेही सांगण्यात आले.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील समाज निर्माण करण्याचे काम युवकांनी हाती घ्यावे : सैदप्पा झळकी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/तालुका प्रतिनिधी : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील समाज निर्माण करण्याचे काम समाजातील तरुण मुलांनी हाती घ्यावे असे वक्तव्य रिपब्लिकन पक्ष(आठवले गट)चे जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांनी व्यक्त केली आहे.

आज दुधनी येथील काही तरुण कार्यकर्त्यांना संबोधित करतांना वरिल वक्तव्य श्री सैदप्पा झळकी यांनी व्यक्त केली.पुढे बोलतांना म्हणाले की,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती साजरा करतांना समाजातील एकमेकांना खेला खेती करण्यापेक्षा एकमेकांनी खांद्याला खांदा मिळवून पुढे जाण्यातच समाजाचा खरे प्रगती होईल.तरच बाबासाहेबांच्या जयंतीला शोभा वाढेल.त्या ऐवजी बाबासाहेबांच्या नांवाचा बदनाम होईल असे कुठल्याही कृत्य घडू नये अशा दक्षता युवकांनी जोपासावे असे प्रतिपादन ही यावेळी श्री.सैदप्पा झळकी यांनी व्यक्त केली आहे.




याप्रसंगी रिपाइंचे शहर अध्यक्ष श्री.गोरखनाथ धोडमनी, मु.आ. शहर अध्यक्ष श्री.महेंदिमिंया जिडगे, काशिनाथ लोड्डे, जयभीम बळूंडगी, लक्ष्मीपुत्र रेऊर, गौतम झळकी, यशसिध्दी न्यूजचे प्रतिनिधी निंगप्पा निंबाळ, खाजप्पा लोड्डे, संतोष जन्ना, सतिश लोड्डे, खाजप्पा शिंगे, सैदप्पा लोड्डे, निंगप्पा बळूंडगी, रामा बसवनकेरी, गणेश गायकवाड सह बुध्दनगर व भीमनगर येथील अनेक कार्यक दल ते उपस्थित होते.

## थोडक्यात...

### नाट्य कलावंत अर्जुन जाधव यांचे निधन



वागदरी (प्रतिनिधी) : शहापूर ता.तुळजापूर येथील भटक्या विमुक्त जाती जमातितील कैकाडी समाजाचे जेष्ठ नाट्य कलावंत अर्जुन भिमराव जाधव यांचे नुकतच वृद्धापकाळी आजाराने दुःखद निधन झाले. कै.अर्जुन जाधव हे अखिल भारतिय भटक्या विमुक्त जाती जमाती महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा सेंट्रल रेल्वे बोर्डाचे सदस्य बिभिषण जाधव यांचे वडिल होते.कै.अर्जुन जाधव यांची शहापूर व पंचक्रोशीत उत्कृष्ठ नाट्य कलावंत म्हणूनओळख होती. त्यानी आपल्या हायातीमध्ये पारंपारिक व्यवसाय जोपासत अनेक नाटकात नाटय कलावंत म्हणून समाज प्रबोधनाचे कार्य केले. दि.१७ सप्रिल २०२५ रोजी रात्री १. वा. दरम्यान अल्पशा आजाराने त्यांचे निधन झाले. त्याच दिवशी दुपारी ३. वा. दरम्यान त्यांच्या पार्थीवावर शहापूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आला. त्यांच्या पश्चात पत्नि, दोन मुलं, तिन मुली,सुना, जावाई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### हरवली आहे



भिवंडी : भिवंडी तालुक्यातील पडघा पोलिस स्टेशन हद्दीतील मूळ गाव महाप तर सद्या राहणार बालाजीनगर साईधाम अपार्टमेंट येथील कृतिका सुभाष मते ( वय १९ ) ही मुलगी पडघा येथून हरवली असल्याची तक्रार वडिलांनी पडघा स्टेशन मध्ये नोंदवली आहे. ही मुलगी पडघां येथे भाजिपाला आणण्यासाठी गेली होती. ती परत घरी आलीच नाही. कृतिका सुभाष मते वय-१९ वर्ष व्यवसाय-शिक्षण रा. साईधाम अपार्टमेन्ट, बी-पहीला माळा, रुम नं. ४. पडघा, बाळाजी नगर, ता. भिवंडी, जि. ठाणे. मुळ गाव-मु महाप, पो. पाच्छापूर, ता. भिवंडी, जि. ठाणे रंगाने-गहूवर्ण, केस काळे लांब, माथ्यावर लाल टिकली लहान, अंगाने सडपातल ऊंची ५ फुट २ इंच अंगात काळ्या रंगाचा हाफ टी शर्ट,निळ्या रंगाची जिन्ना पॅन्ट, पायात काळ्या रंगाची स्टेन्डल, मराठी हिंदी भाषा बोलणारी असा वर्णनाची मुलगी ही बाजारातुन भाजीपाळा आणण्यास गेली होती ती अद्याप पावेतो घरी परत आली नाही. कुणाला दिसल्यास पडघा पोलीस स्टेशनशी ०२५२२/२६८१०० या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन पडघा पोलीस स्टेशनच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

### अज्ञात चोरट्याने मोबाईल पळवला

सोलापूर (प्रतिनिधी) सहपरिवारासोबत गड्डा यात्रेत असलेले पन्नालाल मनोरंजन पाहून बाहेर येत असताना अज्ञात चोरट्याने श्रीकांत सुभाष महिंद्रकर (वय-३३,रा. इंदिरानगर ७० फूट रोड) यांच्या मागच्या खिशात ठेवलेला १५ हजार रुपये किमतीचा मोबाईल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली.

# समाजातील प्रत्येक व्यक्तीला जगविण्याची जबाबदारी ही समाजाची : मुख्यमंत्री फडणवीस

## दिव्यांगांना कृत्रिम अवयव बसविण्याचे गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड प्रमाणपत्र प्रदान सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पाश्चिमात्य संकृती ही ज्याच्याकडे शक्ती आहे तो जगेल असे म्हणते. भारतीय संस्कृती मात्र, जो जन्माला आला आहे तो जगेल आणि समाज त्याला जगवेल असे सांगते. त्यामुळे समाजातील प्रत्येक व्यक्तीला जगविण्याची जबाबदारी ही समाजाची आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

भारत विकास परिषद विकलांग पुनर्वसन केंद्र, पुणे आणि ढोले पाटील एज्युकेशन सोसायटी आयोजित दिव्यांगांना कृत्रिम अवयव बसविण्याचे गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड प्रमाणपत्र प्रदान सोहळा भांडारकर संस्था लॉ कॉलेज रोड येथे संपन्न झाला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, आमदार सिद्धार्थ शिरोळे, विकलांग पुनर्वसन केंद्राचे अध्यक्ष दत्तात्रय चितळे, ढोले पाटील एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सागर ढोले पाटील, केंद्राचे विश्वस्त व प्रमुख विनय खटावकर, सचिव राजेंद्र जोग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या




सल्लागार परिषदेचे सदस्य राजेश पांडे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले, भारत विकास परिषद आणि ढोले पाटील एज्युकेशन सोसायटीने अत्यंत नियोजनबद्ध व्यवस्था करून आणि सेवा आणि समर्पण हा भाव ठेऊन दिव्यांगांना कृत्रिम अवयव देण्याचा एक नवीन जागतिक विक्रम तयार केला. सेवेचाच भाव ठेऊन काम करणाऱ्यांसाठी विक्रम बनवावा लागत नाही तर तो एक विसावा असून हा प्रवास कधीच थांबत नाही. हा विक्रम पुन्हा हीच संस्था मोडेल असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. संस्थेच्या रौप्य महोत्सवाच्या निमित्ताने या केंद्राचे नाव दिव्यांग पुनर्वसन केंद्र करावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

गेल्या काही वर्षांमध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिव्यांगांच्या संदर्भात अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. विशेषतः आर्टिफिशियल लिम्ब्ज मनुफॅक्चरिंग कार्पोरेशन ऑफ इंडिया (अलिम्को) स्थापन केल्यामुळे पूर्वी जे अत्याधुनिक कृत्रिम अवयव (प्रोस्थेटिक पार्ट्स) आयात करावे लागत होते; ते तयार करण्याचे तंत्रज्ञान भारतात आणल्याने जागतिक गुणवत्तेचे कृत्रिम अवयव आपल्या देशात तयार होत आहेत. मोठ्या ग्रामीण भागातील लोकांपर्यंत हे तंत्रज्ञान पोहाचले पाहिजे यासाठी केंद्र सरकारने योजना सुरू केली असून शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला आहे, असे देखील मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

राज्यातील शासकीय कार्यालये, संकेतस्थळे या सर्व ठिकाणी सुगमता आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. १०० दिवसांच्या कार्य आराखड्यामध्ये दिव्यांगांकरिता सुगमता निर्माण करणे हेदेखील लक्ष्य दिले आहे, अशी माहिती देखील श्री. फडणवीस यांनी दिली.

श्री. चितळे यांनी माहिती दिली. या विक्रमात दिव्यांगांना ८ तासात ८९२ अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त कृत्रिम हात, पाय अवयव बसविण्यात आले. संस्थेला या कार्यासाठी आर्थिक मदतीसाठी मोठ्या प्रमाणात दानशूर व्यक्ती, संस्था पुढे येतात. सेवेतून चांगले संस्कार व्हावेत यासाठी प्रयत्न असतो, असेही ते म्हणाले.

यावेळी श्री. ढोले पाटील, श्री. खटावकर यांनी मनोगत व्यक्त केले.

गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्सचे परीक्षक स्वप्नील डांगरेकर यांनी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या उपस्थितीत भारत विकास परिषद विकलांग पुनर्वसन केंद्राला जागतिक विक्रमाचे प्रमाणपत्र प्रदान केले. यावेळी जागतिक विक्रमाबाबत माहितीची चित्रफित दाखविण्यात आली. प्रायोजक संस्थांच्या प्रतिनिधींचा सत्कार करण्यात आला.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाणून घेतल्या जनतेच्या समस्या; मुख्यमंत्र्यांच्या जनता दरबारात ६२६ अर्ज




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुख्यमंत्री सचिवालयात आयोजित जनता दरबारात जनतेच्या समस्या जाणून घेतल्या व त्यांच्या निराकरणासाठी विविध विभागाकडे उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित केल्या. त्यांनी या जनता दरबारात एकूण ६२६ निवेदने स्वीकारली.

महिला व बाल विकास विभागाच्या पिंक ई-रिक्षा वितरण कार्यक्रमाला उपस्थिती लावल्यानंतर मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांना भेटण्यासाठी व आपल्या समस्या मांडण्यासाठी नागपूरच्या विविध भागातील नागरिकांनी येथील सिव्हिल लाईन्स परिसरातील हैदराबाद हाऊस या मुख्यमंत्री सचिवालयात एकच गर्दी केली होती. श्री. फडणवीस यांची दिव्यांग, महिला, विविध सामाजिक संस्था, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या समस्या सांगून निवेदन दिले. म्हणणे ऐकून घेत मुख्यमंत्री यांनी जनतेच्या समस्या सोडवण्याबाबत आश्वस्थ केले. दुपारी १२ ते ३ दरम्यान या जनता दरबारात जवळपास २ हजार नागरीक सहभागी झाले होते तर ६२६ निवेदन प्राप्त झाली आहेत.

विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र सिंगल, मनपा आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मिना, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्यासह, ऊर्जा विभाग, सार्वजनिक बांधकाम, भूमि अभिलेख, समाज कल्याण आदी विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

### गेट वे ऑफ इंडिया येथे 'जागर संविधानाचा' भव्य कार्यक्रम

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना जागतिक व्यासपीठावर नेण्याचा संकल्प : सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : संविधान अमृत महोत्सव व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त सादर करण्यात आलेला जागर संविधानाचा गौरव विश्वरत्न डॉ. बाबासाहेबांचा हा सांगीतिक कार्यक्रम केवळ सांस्कृतिक कार्यक्रम न राहता, सामाजिक जाणीव जागवणारा हा सोहळा आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानातून दिलेली मूल्ये, तत्वे आणि त्यांचे विचार जगाला मार्गदर्शक असून त्यांची ही मूल्ये व विचार जगाच्या व्यासपीठावर नेण्यात येणार असून अमेरिका आणि युरोपमधील विद्यापीठात सुध्दा चर्चासत्र, शोधनिबंध सादर करण्यात येतील, असा संस्कृतिक कार्य विभागाचा मानस असल्याचे प्रतिपादन सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे गेट वे ऑफ इंडिया येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमामध्ये आमदार संजय उपाध्याय, मुख्य सचिव सुजाता सौनिक, माजी मंत्री विजय उर्फ भाई गिरकर, राज पुरोहित, मुख्यमंत्री कार्यालयाचे व संस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य



सचिव विकास खारगे, सांस्कृतिक कार्य विभागाचे संचालक विभीषण चवरे यांच्यासह सिने, नाट्य व संगीत क्षेत्रातील मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

**अमेरिका आणि युरोपमधील विद्यापीठात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर चर्चासत्र ठेवणार !**

मंत्री श्री. शेलार म्हणाले, संविधानाला ७५ वर्षे पूर्ण होत असताना सांस्कृतिक विभागातर्फे हा कार्यक्रम आयोजित करून संविधानाचा जागर करण्यात येत आहे. राज्यात या निमित्ताने चर्चासत्रे, उद्देशिकेचे वाचन, घरोघरी संविधान यासारख्या उपक्रमांचे आयोजन केले जात आहे.

याचबरोबर बाबासाहेबांचे विचार आणि भारतीय संविधान जागतिक विद्यापीठांमध्ये अभ्यासासाठी मांडण्याचा सांस्कृतिक विभागाचा संकल्प आहे.

अरबी सागराच्या साक्षीने आणि गेट वे ऑफ इंडिया या ऐतिहासिक स्थळी हजारोंच्या उपस्थितीत 'जागर संविधानाचा' हा कार्यक्रम होत आहे. नाट्य, संगीत आणि नृत्य यांचा सुरेख संगम हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य असल्याचे मंत्री श्री. शेलार म्हणाले.

मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी व अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिनेते सुबोध भावे यांनी केले.

**जागतिक वसुंधरा दिनानिमित्त 'पर्यावरण वाचवा वसुंधरा सजवा' उपक्रमात सहभागी व्हा!**

**आपल्या वसुंधरेसाठी नऊ दिवस समर्पित भावनेने काम करा**

# २२ एप्रिल ते १ मे २०२५ या कालावधीत राज्यात विविध उपक्रम साजरे होणार : पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग मंत्री पंकजा मुंडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पर्यावरणाचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी जागतिक वसुंधरा दिन दिनांक २२ एप्रिल, २०२५ ते महाराष्ट्र दिन १ मे, २०२५ या कालावधीत पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने राज्यात 'पर्यावरण वाचवा वसुंधरा सजवा' (पर्यावरण बचाओ वसुंधरा सजाओ) हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी केले आहे.

'पर्यावरण वाचवा वसुंधरा सजवा' या उपक्रमांतर्गत मंत्री पंकजा मुंडे या स्वतः २२ एप्रिल रोजी मुंबईतील पवई तलाव येथे स्वच्छता मोहिमेत सहभागी होणार आहेत. या उपक्रमात सर्व नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन श्रीमती मुंडे यांनी केले आहे.

नदी, नाले, तलाव स्वच्छता अभियानात सहभागी व्हावे

श्रीमती मुंडे म्हणाल्या, २२ एप्रिल हा जागतिक वसुंधरा दिवस आहे. या दिवशी आम्ही पर्यावरण वातावरणीय बदल विभागामार्फत एक अत्यंत चांगली संकल्पना राबवत आहोत. ती संकल्पना म्हणजे जागतिक वसुंधरा दिवसाच्या पासून म्हणजे, २२ एप्रिल ते १ मे महाराष्ट्र दिनापर्यंत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. जसं आपण नवरात्र साजरा करतो, नऊ दिवस देवीच्या विविध रूपांची पूजा करतो, आराधना करतो, तसंच वसुंधरेची आराधना करण्यासाठी हे नऊ दिवस विविध कार्यक्रम आपण सर्वांनी राबवावेत.

२२ एप्रिल रोजी या कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. मी स्वतः २२ एप्रिल रोजी पवई लेक मुंबई येथून स्वच्छतेची सुरुवात करणार आहे. दि. २२, २३ आणि २४ एप्रिल रोजी आपण सर्वांनी आपापल्या भागातील, आपल्या गावातील, आपल्या तालुक्यातील, आपल्या जिल्ह्यातील, आपल्या महानगरातील, नगरातील पाण्याचे विविध स्त्रोत साफ करायचे आहेत. नद्या, नाले, तलाव ह्यांची स्वच्छता करायची आहे. ग्रामपंचायतीच्या ग्राम सेवकापासून ते जिल्हा परिषद सीईओपर्यंत, तलाठ्यापासून ते जिल्हाधिकारीपर्यंत, ग्रामपंचायतच्या सरपंच, सदस्यापासून ते जिल्हा परिषद अध्यक्षापर्यंत आणि आमदार, खासदार, पालकमंत्री या सर्वांनी यामध्ये सहभाग घ्यावा, असे आवाहन श्रीमती मुंडे यांनी केले आहे.

याबरोबर शासकीय यंत्रणासमवेत वेगवेगळ्या संघटना, स्वयंसेवी संस्था यांनी देखील यामध्ये सहभाग घ्यावा.




नदी - नाले, सरोवर स्वच्छ करणाऱ्या लोकप्रतिनिधीचे अधिकाऱ्याचे आणि सामाजिक संस्थेचे मूल्यमापन करून त्यांचा सुद्धा जिल्हा पातळीवर पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहणानंतर सन्मान होईल आणि राज्यभरातून अशा अत्यंत चांगल्या काम केलेल्या लोकांचा राज्यपातळीवरही सन्मान होईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

रीड्यूस, री-यूज आणि रिसायकल या त्रिसूत्रीचा प्रयोग करणाऱ्यांचा होणार सत्कार

दि. २५, २६ आणि २७ एप्रिल या तीन दिवसांमध्ये विविध संघटना, शासकीय यंत्रणा, लोकप्रतिनिधी या सर्वांनी मिळून रीड्यूस, री युज आणि रिसायकल या तत्त्वाप्रमाणे म्हणजे, आपण कुठल्याही चुकीच्या गोष्टींचा वापर कमी करणे म्हणजे रीड्यूस करणे, त्याचबरोबर कोणत्याही चांगल्या गोष्टी ज्या आपण परत परत वापरू शकतो त्यांचा रीयूज करणे आणि कुठल्याही गोष्टी जसे पाणी रिसायकल करतो आणि ते वापरतो त्यामुळे आपण वसुंधरेचा म्हणजे पृथ्वीचा फार मोठा फायदा त्याच्यामधून होतो आणि पर्यायी आपल्याला त्याचा फायदा होत असतो. त्यामुळे या त्रिसूत्री चा वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

श्रीमती मुंडे म्हणाल्या की, रीड्यूस, री यूज आणि रिसायकल या तत्त्वावर कोणी जर अत्यंत चांगले प्रयोग केले असतील, तर या प्रयोगांचा सन्मान एक मे रोजी महाराष्ट्रदिनी ध्वजारोहणानंतर पालकमंत्र्यांच्या हस्ते त्या त्या जिल्ह्यामध्ये होईल. तसेच हे प्रयोग राज्य पातळीवर मागवून यांच्यामधले उपयुक्त प्रयोगाचे कौतुक करून त्यांचा सन्मान करण्यात येईल. तसेच अशा प्रयोगाचा उपयोग विविध योजनामध्ये करण्याचा विचार आहे, असेही त्यांनी सांगितले.

घोषवाक्य स्पर्धा घेऊन विजेत्यांना गौरविणार

दि . २८, २९ व ३० एप्रिल या तीन दिवसांमध्ये पर्यावरण बचाव वसुंधरा सजाव या अभियानाच्या माध्यमातून घोषवाक्य (स्लोगन) स्पर्धा घेण्यात येणार आहेत. त्यातील उत्कृष्ट घोषवाक्य तयार करणाऱ्यांचा सन्मान हा महाराष्ट्र दिनानिमित्त करण्यात येईल. तसेच या घोषवाक्याचा समावेश महाराष्ट्र दिनाच्या संचलनात देखील करण्यात येईल. प्रत्येक जिल्ह्यामधून तीन असे घोषवाक्य घेऊन राज्यस्तरावर तीन उत्कृष्ट घोषवाक्य निवडण्यात येतील. याचा वापर महाराष्ट्राच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या जाहिरातींमध्ये केला जाईल. उत्कृष्ट तीन घोषवाक्य करणाऱ्यांचा राज्यस्तरावर सन्मान करण्यात येईल.

२२ एप्रिल ते १ मे या कालावधीत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. हे उपक्रम यशस्वी होण्यासाठी लोकप्रतिनिधी तसेच सामान्य नागरिक यांचा सहभाग आवश्यक आहे. त्यामुळे या उपक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन श्रीमती मुंडे यांनी केले आहे.